“सूपर-३०” या हिंदी चित्रपटाच्या तिकीटदरावर लागू असलेल्या राज्य वस्तू व सेवा कराचा (एसजीएसटी) परतावा देणे संबंधात.....

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक- संकिर्ण २०१९/ प्र.क्र.८०/कराधान-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक- ३१ जुलै, २०१९

प्रस्तावना :-

“सुपर ३०” हा मुळात एक भारतीय शैक्षणिक उपक्रम असून तो सर्वप्रथम श्री.आनंदकुमार, जे एक गणितज्ञ आहेत, त्यांनी बिहार राज्यामध्ये “रामानुजन स्कूल ऑफ मॅथमेटीक्स्” या तत्वप्रणालीवर आधारीत म्हणून राबवला. ज्यामध्ये सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमधून हुशार विद्यार्थी निवडून त्यांना जे.ई.ई. व तत्सम स्पर्धा परिक्षेकरिता तयार केले जाते. या तत्वप्रणालीमुळे प्रभावित होऊन एक हिंदी चित्रपट “सुपर ३०” या नावाने तयार करण्यात आला असून नुकताच प्रदर्शित झाला आहे. सदर चित्रपट श्री. आनंदकुमार ह्यांनी राबविलेल्या संकल्पनेवर आधारित असून त्याद्वारे एक सामाजिक संदेश जनमानसात पोहोचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांमध्ये सुद्धा हूशार विद्यार्थ्यांची वानवा नसून, गुणवत्ता भरपूर प्रमाणात अस्तित्वात असते. अशा गुणवत्तेस योग्य मार्गदर्शन व योग्य दिशा मिळाल्यास यशामध्ये परावर्तित होऊ शकते.

असा एक महत्वपूर्ण सामाजिक संदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यात हा चित्रपट यशस्वी झालेला आहे.

शासन निर्णय :-

शासनाने राज्यातील चित्रपटगृहातील “सुपर-३०” या हिंदी चित्रपटाच्या तिकिटाच्या रक्कमेवर आकारला जाणाऱ्या राज्य वस्तू व सेवाकराच्या (एसजीएसटी) समतूल्य रक्कमेची प्रतिपूर्ती करण्याचा निर्णय घेतलेला आहे व त्यासाठी खालील अटी लागू असतील.

१. नोंदणीकृत चित्रपटगृहांनी राज्य शासनाने निर्देशित केलेल्या अवधीमध्ये प्रदर्शित होणाऱ्या उपरोक्त चित्रपटाच्या तिकिटावरील राज्य वस्तू व सेवाकराच्या (एसजीएसटी) समतूल्य रक्कम तिकीटाच्या एकूण किंमतीतून कमी करुन तिकिटाची विक्री प्रेक्षकांना करावी. असे असले तरी, नोंदणीकृत चित्रपटागृहांनी तिकिटाच्या किंमतीवरील राज्य वस्तू व सेवा कराची (एसजीएसटी) रक्कम शासकीय तिजोरीत नेहमीप्रमाणे भरणे आवश्यक आहे.

२. चित्रपटाच्या प्रदर्शनासाठी संबंधित चित्रपटगृहातील प्रवेश शुल्कामध्ये वृध्दी करण्यात येणार नाही तसेच विविध वर्गाच्या आसन क्षमतेमध्ये परिवर्तन करता येणार नाही.

३. नोंदणीकृत चित्रपटागृहांनी प्रेक्षकांकडून अगोदरच राज्य वस्तू व सेवा कराची रक्कम वसूल केली असेल तर त्याची प्रतिपूर्ती करण्यात येणार नाही. तसेच चित्रपटगृहाने `शासन निर्णय निर्गमित झाल्यावर राज्य वस्तू व सेवा कराची (एसजीएसटी) रक्कम वसूल केली असेल तर त्याची प्रतिपुर्ती देखील करण्यात येणार नाही.

४. वस्तु व सेवाकर कायद्यांतर्गत विहित विवरण दाखल करुन देय कराचा भरणा केल्यानंतर चित्रपटगृह चालकांना देय राज्य व वस्तु सेवा कराच्या परताव्यासाठी अर्ज करता येईल.

५. चित्रपटगृहांनी देय राज्य वस्तू व सेवाकराच्या (एसजीएसटी) रक्कमेचा परतावा, त्यांनी विहित नमुन्यात अर्ज केल्यापासून ३० दिवसाच्या आत देण्यात येईल.

६. राज्यकर आयुक्त, वस्तू व सेवाकर विभाग यांचेकडून संबंधित प्रतिपूर्तीसाठी आवेदनाची पध्दती व प्रक्रिया यासंबंधी वेगळे दिशानिर्देश यथावकाश प्रसिध्द केले जातील.

७. सदर शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून, राज्य वस्तू व सेवाकराचा (एसजीएसटी) परतावा सवलत चित्रपटगृहांना लागू होईल व ती दि.३१ डिसेंबर, २०१९ पर्यंतच्या कालावधीकरीता लागू राहील.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७३११७५६३३४६०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJIV JALOTA

Digitally signed by RAJIV JALOTA
DN: c=IN, o=STATE TAX OF MAHARASHTRA, postalCode=400006,
st=Maharashtra,
2.5.4.20=2ea4aebdecd0cb8c3908b236f45b34b5e8995af8819aa928b6141f0b58
6d6901,
serialNumber=62df6dd905fe9d5e9d5d8133a5f81afe592bd2df93aa0f4965113f3
6c671b75e, cn=RAJIV JALOTA
Date: 2019.07.31 18:03:09 +05'30'

(राजीव जलोटा)
शासनाचे अपर मुख्य सचिव

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री (वित्त) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
४. मा. राज्यमंत्री (वित्त) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
५. वित्त विभाग, (व्यय-३ व अर्थोपाय कार्यासन), मंत्रालय, मुंबई
६. राज्यकर आयुक्त, वस्तू व सेवा कर विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. प्रधान महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)/ लेखा परीक्षा, मुंबई
८. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)/ लेखा परीक्षा, नागपूर
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुबई
१०. निवडनस्ती.